ePaper

## रोहित शर्माने रिटायरमेंटबद्दल निर्णय सांगितला, चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर मोठी घोषणा

| वर्ष - 8 | अंक - 233 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- तब्बल २५ वर्षांपूर्वीचा हिशोब चुकता...!
- रोहितचं निवृत्तीच्या अफवांवर वक्तव्य
- सीरियात पुन्हा हिंसाचार!
- अमेरिकेत पुन्हा मंदिराची विटंबना


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 10 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## रो'हिट', श्रेयसची उत्तुंग फटकेबाजी; गिल, अक्षरची दमदार साथ!

# क्रिकेटमध्ये 'टीम इंडिया'च 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स !

## भारताच्या 'फिरकी'ने न्यूझीलंडला अक्षरश: नाचवले !

| दुबई | वृत्तसंस्था महाईन्यूज

**दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रोहित शर्माच्या 'टीम इंडिया'ने न्यूझीलंडचा चार गडी राखून पराभव केला आणि 'चॅम्पियन ट्रॉफी' वर भारताचे नाव कोरले. संपूर्ण जगातील क्रिकेटप्रेमींना अपेक्षित असणारा हा दिमाखदार विजय नोंदवून भारताने आपले क्रिकेट जगतावरील वर्चस्व कायम राखले आहे.**




प्रथम फलंदाजी स्वीकारून न्यूझीलंडने भारतापुढे २५२ धावांचे आव्हान ठेवले, सुरुवातीला ते सोपे वाटत होते. पण, टप्प्याटप्प्याने भारताचे गडी बाद होत गेले आणि शेवटी भारताने चार गडी राखून विजय मिळवला

न्यूझीलंडकडून डॅरिल मिचेल आणि मायकल ब्रेसवेलने ठोकलेल्या अर्धशतकांनी त्यांना सावरले. ऐन बहरात असलेल्या भारतीय फिरकीच्या चौकडीने न्यूझीलंडचे सर्व फलंदाज स्थिर होण्यापूर्वीच तंबूत धाडले.

### रो'हिट' चे हार्ड हीटिंग..

सलग पंधरा वेळा नाणेफेक हरल्यामुळे रोहित शर्माने अनोखा विक्रमच रचला. पण, दुसऱ्याच चेंडूवर षटकार ठोकून त्याने आपला मनसुबा दाखवून दिला. रो'हिट' याला सूर गवसला आणि त्याने उत्तुंग फटकेबाजी केली. त्याला सुरुवातीला शुभमन गिलने खंबीर साथ दिली. आज विराट कोहलीच्या नशिबी अपयश लिहिले असावे, अत्यंत दुर्दैवी पद्धतीने तो बाद झाला.

### श्रेयस अय्यरची उत्तुंग फटकेबाजी

विराट बाद झाल्यानंतर आलेल्या श्रेयस अय्यरने काही उत्तुंग षटकार ठोकून भारतीय संघाची विजयाकडील वाटचाल सुरूच ठेवली. शेवटी हार्दिक पांड्या आणि के.एल.राहुल यांनी चांगलाच किल्ला लढवला.

### संपूर्ण देशात विजयाचा जल्लोष..

भारताने न्यूझीलंडवर मिळवलेल्या शानदार विजयामुळे संपूर्ण देशात विजयाचा जल्लोष आणि आनंदोत्सव झाला. फटाक्याची जोरदार आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत क्रिकेटप्रेमींनी रोहित विराट आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या फोटोच्या मिरवणुका काढल्या. तमाम भारतीयांसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे.



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून अभिनंदन

या जबरदस्त विजयामुळे भारतीय संघाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तसेच सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आणि मंत्र्यांनी जोरदार अभिनंदन केले आहे. अनेक ठिकाणी लाडू आणि पेढ्यांचे वाटप करून आनंद व्यक्त करण्यात आला.

### रोहित शर्माच्या निवृत्तीची जोरदार चर्चा..

ही चॅम्पियन्स ट्रॉफी भारताला जिंकून देऊन कर्णधार रोहित शर्मा हा निवृत्त होणार असल्याची दिवसभर खेळाडूंमध्ये चर्चा सुरू होती. सलामीला येऊन आज रोहितने कर्णधाराला साजेशी खेळी सुद्धा केली. हल्ली रोहितची जाडी वाढली असून त्याचे 'रिफ्लेक्सेस' कमी झाल्याची टीकाही होत होती. पण, आजची रोहित शर्माची फलंदाजी पाहून त्याने निवृत्त होऊ नये, अशीच भावना बहुतेक क्रिकेट प्रेमींनी व्यक्त केली होती. शेवटी त्याने निवृत्तीची घोषणा केली नसल्याने अवघ्या क्रिकेट प्रेमींनी सुस्कारा टाकला हे नक्की !

### पंतप्रधान, गृहमंत्री, राष्ट्रपतींनी दिल्या शुभेच्छा!

भारताच्या या रोमहर्षक विजयावर पंतप्रधान मोदीं, गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी इंस्टाग्राम पोस्टमध्ये म्हणाले की, 'एक असा विजय ज्याने इतिहास रचला. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये शानदार विजय मिळवल्याबद्दल टीम इंडियाचे अभिनंदन. तुमच्या उत्कट उर्जेने आणि मैदानावरील अविस्मरणीय वर्चस्वाने देशाला अभिमान वाटला आणि क्रिकेटच्या उत्कृष्टतेसाठी एक नवीन मानक स्थापित केले आहे. तुम्ही नेहमीच उत्कृष्ट कामगिरी करत राहा.


## ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ गाडगीळ म्हणाले;

# अणुऊर्जा प्रकल्पांना भविष्यात मोठा धोका!

### जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे

। पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे अरबी समुद्रात मोठी चक्रीवादळे निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. या चक्रीवादळांचा देशाच्या पश्चिम किनारपट्टी भागाला धोका असून, तारापूर आणि जैतापूरसारख्या अणुऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणीही भविष्यात यामुळे मोठी दुर्घटना घडू शकतो, असा इशारा ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी दिला.**



पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या (पीआयसी) वतीने आयोजित तापमान आणीबाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यात तापमानवाढीचे आव्हान आणि त्यावरील कृती यावर चर्चा करण्यात आली. या परिषदेत डॉ. गाडगीळ बोलत होते. या वेळी परिषदेचे संयोजक व पीआयसीचे विश्वस्त प्रा. अमिताव मलिक, पीआयसीचे अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, उपाध्यक्ष डॉ. विजय केळकर, अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे आदी उपस्थित होते. या वेळी डॉ. गाडगीळ म्हणाले, की अरबी समुद्रात निर्माण झालेली वादळे आधी अरेबियाच्या दिशेने जात असत. गेल्या दोन दशकांत ही वादळे भारताच्या दिशेने येत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राचे तापमान वाढत आहे. त्यामुळे मोठी चक्रीवादळे निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. या चक्रीवादळांमुळे देशाच्या पश्चिमी किनारपट्टीला धोका निर्माण झाला आहे. तारापूर आणि जैतापूरसारख्या अणुऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणी चक्रीवादळे धडकून भविष्यात मोठी दुर्घटना घडू शकते. याचबरोबर केरळमधील विळिंजम आणि गोव्यातील वास्को द गामा या बंदरांनाही चक्रीवादळांमुळे धोका निर्माण झालेला आहे.केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोळसा आयात करण्यासाठी वास्को द गामा बंदराची खोली न वाढविण्याची शिफारस केली होती. कोळसा जाळल्याने हवेतील प्रदूषकांचे प्रमाण वाढत असून, जगात भारतात हे प्रमाण अधिक आहे. या प्रदूषकांमुळे कमी कालावधीत जास्त पाऊस पडून त्यामुळ पूर येण्याचे आणि दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. केरळमधील वायनाडमध्येही हेच घडले. एका अभ्यासानुसार २०१० ते २०२० या कालावधीत दरडी कोसळण्याचे प्रमाण शंभर पटींनी वाढले आहे. ते भविष्यात आणखी वाढण्याचा अंदाज आहे, असे डॉ. गाडगीळ यांनी नमूद केले.परिषदेचे संयोजक व पीआयसीचे विश्वस्त प्रा. अमिताव मलिक, पीआयसीचे अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, उपाध्यक्ष डॉ. विजय केळकर, अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे आदी उपस्थित होते.या वेळी डॉ. गाडगीळ म्हणाले, की अरबी समुद्रात निर्माण झालेली वादळे आधी अरेबियाच्या दिशेने जात असत. गेल्या दोन दशकांत ही वादळे भारताच्या दिशेने येत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राचे तापमान वाढत आहे.

#### समाजामध्ये बेरोजगारी वाढली

गंगेच्या काठावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आहेत; मात्र, ते चालविण्यासाठी वीज नाही. गंगेतील प्रदूषणामुळे माशांचा पुरवठा कमी झाला असून, तेथील कोळी समाजामध्ये बेरोजगारी वाढली आहे. त्यामुळे ते उपजीविकेसाठी ते वाळूउपसा करीत आहेत. महाराष्ट्रातील इंद्रायणी नदी कायम फेसाळलेली असते. त्याचे कारण शोधण्यासाठी आपण जपानी सल्लागारांना पैसे देत आहोत.

---

## गांधींची अहिंसा फॅशन नव्हती!

### ज्येष्ठ उद्योगपती अरुण फिरोदिया : ब्रिटिशांनी उद्योग बुडवणारी अनेक धोरणे आणली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गांधी स्मारक निधीतर्फे गांधी भवन येथे आयोजित गांधी विचार साहित्य संमेलनात ज्येष्ठ उद्योगपती अरुण फिरोदिया 'मी आणि गांधीजी' या विषयावर बोलत होते. लेखक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत वानखेडे, ज्येष्ठ संपादक श्रीराम पवार, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष शमशुद्दीन तांबोळी या वेळी उपस्थित होते.**




अरुण फिरोदिया म्हणाले, ' ब्रिटिश त्यांच्या देशातून कापड आणायचे आणि ते इथे विकायचे. ब्रिटिशांनी भारतीय उद्योग बुडवणारी अनेक धोरणे आणली. त्यांनी या देशातील कापड व्यवसायाला बुडवण्यासाठी कापसाच्या व्यापारावर प्रचंड कर लावला. मात्र, गांधींनी इंग्रजांना शह देण्यासाठी स्वदेशीचे सूत्र अवलंबले. त्यांनी खादीला चालना दिली. चरखा चालविण्याची मोहीम सुरू केली. शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा हा उद्देशही त्यामागे होता. भारतात एखादे उत्पादन चालले, तर ते जगभरात का चालणार नाही?, हे गांधींचे तत्त्व डोळ्यासमोर ठेऊन आपले तंत्रज्ञान प्रगत केले पाहिजे, या उद्देशाने मी अमेरिकेत होतो तेव्हा माझ्या वडिलांनी तू भारतात ये, आपल्याला मोपेड स्कूटर तयार करायची आहे, असे पत्राद्वारे कळविले. सायकल आणि मोटार यांमधील वाहन करायचे आहे, असे सांगून त्यांनी मला १५ लाख रुपये दिले. त्यावर अभ्यास करून भारतीयांची नेमकी गरज काय आहे? हे लक्षात घेऊन आम्ही लुना तयार केली. भारतीय रस्त्यांवर चालणारी ही गाडी जगात कुठेही चालेल. त्यामुळे ५० हजार लुना अमेरिकेला निर्यात केल्या. गांधीजींनी सांगितलेले स्वावलंबनाचे तत्त्वच मला या कमी मदतीला आले. स्वावलंबन, आपल्या गरजा कमी ठेवाव्यात, अशी गांधीजींची तत्त्वे जगभरातील अनेक देश आणि नागरिक अंमलात आणत आहेत. गांधींचे विचार त्रिकालबाधित सत्य आहेत. त्यामुळे ७०-८० वर्षांपूर्वी त्यांनी सांगितलेली तत्वे, विचार आणि सूत्र आजही लोकांना पटत आहेत. त्याची अंमलबजावणीही होत आहे. हाच गांधी विचारांचा विजय आहे. गांधीजींची अहिंसा हे ब्रिटिशांविरोधात लढण्याचे साधन होते, ती फॅशन नव्हती.'गांधी विचार साहित्य संमेलनात ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार म्हणाले यांनी सरकारच्या धोरणांवर टीका केली. ते म्हणाले, 'आता सत्ताधारी विविध योजनांच्या नावाखाली लाभार्थी तयार करत आहेत. काहीही काम न करता पैसे खात्यात देणे हे काम नाही केले तर वेतन घेण्याचा अधिकार नाही, असे सांगणाऱ्या गांधीजींच्या विचारांशी ही सरकार विसंगत आहे. काम न करता तुमच्या खात्यात पैसे टाकतो, तुम्ही केवळ मत द्या, या दिशेने देश जात आहे. प्रश्न विचारणारे, सत्याच्या बाजूने उभे राहणारे सर्वसमावेशक लोक सर्वपक्षीयांना नको आहेत.

#### नेहरूंनी राष्ट्राची उभारणी केली

याला पर्याय द्यायचा असल्यास गांधींनी सांगितल्याप्रमाणे 'करके देखो' आचरणात आणले पाहिजे. गांधींच्या वाटेवरून चालतो, हे सांगणे देखील धारिष्ट्याचे आहे. ज्या राजकारणाचे अधिष्ठान गांधींनी घालून दिले, ते आता 'कटेंगे तो बटेंगे' इथवर आले आहे. एक टक्के लोकांच्या हातात ४० टक्के संपत्ती एकवटली आहेत. अशा प्रकारची विषमता देशात आहे. गांधी, नेहरूंनी ज्या राष्ट्राची उभारणी केली.

## नव्या मार्गामुळे शहर 75 टक्के मेट्रोशी होणार 'कनेक्ट'

# पिंपरी-चिंचवडमध्ये मेट्रोचा मार्ग सुसाट!

## निगडी ते चाकण मार्गाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी - चिंचवड शहरात दापोडी ते निगडी या मेट्रोमार्गानंतर दुसरा मार्ग करण्यात येत आहे. त्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून तो लवकरच पिंपरी - चिंचवड महापालिकेस सादर केला जाईल.**



नवीन मेट्रो मार्ग निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापासून, रावेत, वाकड बायपास, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा यामार्गे तो चाकणपर्यंत असणार आहे. या नव्या मार्गामुळे पिंपरी -चिंचवड शहराचा ७५ टक्के भाग मेट्रोशी कनेक्ट होईल, असा दावा अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. पुणे शहराच्या तुलनेत पिंपरी - चिंचवड शहराकडे नवीन मेट्रो मार्ग निर्माण करण्याबाबत शासनाची उदासीनता दिसून येत आहे. ३० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या आणि झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या पिंपरी - चिंचवड शहरासाठी नवीन मेट्रो मार्गाची गरज असल्याने विविध संघटना आणि संस्थांकडून सात्याने मागणी केली जात आहे. मात्र, त्याबाबत केंद्र, राज्य शासन तसेच, महापालिका प्रशासनही गंभीर नव्हते. अखेर, नागरिकांचा रेटा लक्षात घेऊन महापालिकेने निगडी ते चाकण असा नवीन मेट्रो मार्गाचा डीपीआरचा आराखडा तयार करण्यासमहाराष्ट्रमेट्रोरेलकॉर्पोरेशन लिमिटेडला (महामेट्रो) सांगितले आहे. त्यानुसार, महामेट्रोकडून आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. या मार्गाद्वारे शहराचा दक्षिण भाग तसेच, भोसरीकडील भाग मेट्रोने जोडला जाणार आहे. वाकड आणि पिंपळे सौदागर हा उच्चभ्रू आणि आयटी परिसर मेट्रोने जोडला जाणार आहे. या संपूर्ण मार्गामुळे तसेच, निगडी ते दापोडी मार्गामुळे पिंपरी - चिंचवडचा ७५ टक्के भाग मेट्रोशी जोडला जाईल, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. महामेट्रोकडून आराखडा येत्या ४ ते ५ महिन्यांत तयार होण्याची शक्यता आहे.त्या डीपीआरला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन ती मंजुरीसाठों राज्य व नंतर केंद्र शासनाकडे पाठविला जाईल. केंद्राने मान्यता दिल्यानंतर या नव्या मेट्रो मार्गाचे प्रत्यक्ष काम सुरू होईल. ही सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यास किमान दीड ते दोन वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### जुन्या डीपीआरमध्ये बदल

पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या सूचनेवरून नाशिक फाटा ते चाकण या मार्गाचा महामेट्रोने दोन वेळा डीपीआर तयार केला. पहिल्यांदा निओ मेट्रोचा आराखडा तयार केला होता. त्यानंतर सुधारणा करून मेट्रोचा आराखडा तयार केला. आता पुणे ते नाशिक महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तयार करणार आहे.तो आठ पदरी 'एलोवेटेड कॉरिडॉर' असणार आहे. तो मार्ग नाशिक फाटा येथून सुरू होणार आहे. त्यामुळे मेट्रोचा आराखडा पुन्हा बदलला जाणार आहे. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाशी समन्वय साधून मेट्रोचा नव्याने सुधारित डीपीआर तयार करण्यात येणार आहे. निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक स्टेशन, रावेत, मुकाई चौक, पुणे-मुंबई-बंगळुरू महामार्ग, वाकड बायपास, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा,भोसरी,मोशी,चाकणअसाहामार्ग आहे. या मागांचे अंदाजे ३५ ते ४० किलोमीटर अंतर आहे.

> "पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या सूचनेवरून महामेट्रोकडून निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापासून रावेत, वाकड, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, भोसरी मार्गे चाकणपर्यंत मार्गाचा डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. या नव्या मार्गामुळे पिंपरी - चिंचवड शहराच्या एक तृतीयांश भागातून मेट्रो धावेल. त्या डीपीआरला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर राज्य व केंद्राची मान्यता घेतली जाईल, त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करता येईल."
>
> – **श्रावण हर्डीकर, महामेट्रो , व्यवस्थापकीय संचालक**

### नाशिक फाटा, निगडी जंक्शन

या नव्या मार्गामुळे नाशिक फाटा येथे मेट्रोचे एक जंक्शन होणार आहे. या जंक्शनवरून भोसरी, चाकण, शहरातील दापोडी ते निगडी मार्ग तसेच, पुणे शहरात ये-जा करणे सुलभ होणार आहे. त्यामुळे नाशिक फाटा चौकाचे महत्व आणखी वाढणार आहे. तसेच, निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प मेट्रो स्टेशन येथे जंक्शन तयार होईल. तेथून रावेत, वाकड, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, तसेच, भोसरी व चाकणला ये-जा करता येणार आहे. मेट्रोतून शहरातील बहुतांश भागांत प्रवास करता येईल.

---

## यशस्वीतेसाठी प्रयत्नांमध्ये सातत्य हवे : करवंदे

## शिक्षण विश्व : पीसीपीचे वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात संपन्न

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**क्रीडा क्षेत्रासह कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपल्या प्रयत्नामध्ये सातत्य, एकाग्रता, ध्येय निश्चिती आणि समर्पण भावनेने दिलेले शंभर टक्के योगदान या चतुसूत्रीचा वापर करावा असा गुरु मंत्र खो-खो चे राष्ट्रिय प्रशिक्षक अरविंद करवंदे यांनी दिला.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी भारतीय खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे, प्रसिद्ध पार्श्वगायिका राधा खुडे, पिंपरी पालिकेचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, उद्यान विभागाचे योगेश वाळुंज, रेडिओ जॉकी अक्षय, पीसीबीच्या प्राचार्य डॉ. विद्या बॅकोड, पीसीईटीचे सोशल मीडिया प्रमुख डॉ. केतन देसले, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मनोज वाखारे, क्रीडा विभाग प्रमुख सुनील जगताप, राजू गायकवाड, पीसीपी चे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व निवृत्त कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.
पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड यांनी पीसीईटीच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली पीसीपी मध्ये वर्षभर विद्यार्थी केंद्रित अनेक उपक्रम राबवले जातात याबाबत माहिती दिली. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आदी उपस्थित होते.

# शूर महिलांचा प्रेरणादायी प्रवास...



## भूमिका

**शहिदांच्या पत्नींना ‘वीर नारी’ असे संबोधले जाते. सैनिक कल्याण विभागाच्या नोंदीनुसार अशा वीर पत्नींची संख्या भारतात २६ हजारांपेक्षा अधिक आहे. वीरगती प्राप्त झालेल्या सेनानींच्या पश्चात त्यांच्या कुटुंबियांचे आयुष्य सुकर व्हावे म्हणून सरकारतर्फे त्यांच्या विधवा पत्नीला म्हणजेच वीर नारीला कौटुंबिक निवृत्तीवेतनासह अनेक सेवा सुविधा व सवलती दिल्या जातात.**

काही जणींना अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळते. पण शहीद झालेल्यांचे देशसेवेचे कार्य अपूर्णच राहिल्याची खंत काही संवेदनशील वीर नारींना सतत जाणवत राहते आणि ते कार्य आपण पूर्ण करावे असे त्यांना वाटते.



रवींदरजीत रंधावा आणि सबिना सिंग या दोन तरुण वीर नारी माजी लष्करप्रमुख जनरल व्ही. पी. मलिक यांच्या पत्नी रंजना मलिक यांना दिल्ली येथील लष्करातील कर्मचारी/ अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या ‘आर्मी वाईव्ज वेल्फेअर असोसिएशन’ च्या ऑफिसमध्ये भेटायला गेल्या. पतीचे देशसेवेचे कार्य पूर्ण करण्यासाठी संरक्षण दलात कार्य करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली व त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. युद्धात शत्रूंशी लढताना, दहशतवाद्यांचा बिमोड करत असताना अथवा अपघातात ज्यांना अकाली वीरगती प्राप्त होते अशा शहीदांच्या वीर नारींची संख्या वाढत आहे.वयाची अट आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे अनेक वीर नारींना संरक्षण दलात जाता येत नाही.

तेव्हा इच्छुक वीर नारींना विशेषतः तरुणींना ही संधी उपलब्ध करून द्यावी असे रंजना मलिक यांनी आपले पती जनरल व्ही. पी. मलिक यांना सुचवले. जनरल मलिक यांनी संरक्षण मंत्रालयाला विनंती करून अशी परवानगी मिळवली. या परवानगी बरोबरच केंद्रीय कर्मचारी निवड आयोगाच्या मुलाखतीपर्यंत पोहचण्यासाठी आवश्यक असणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या एकत्रित संरक्षण सेवा परीक्षेत सूट मिळवून तसेच वयोमर्यादा काही प्रमाणात शिथील करून घेण्यात आली.

या नवीन तरतुदींमुळे अनेक वीर नारींना अभिमानाने भारतीय संरक्षण दलात पदार्पण करून देशाची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली. ही संधी प्रथम लष्करात व वायू दलात देण्यास सुरुवात झाली आणि त्यानंतर नौदलात. आत्तापर्यंत जवळजवळ ५० वीर नारी संरक्षण दलात रूजू झाल्या आहेत. अशी संधी देणारे भारतीय संरक्षण क्षेत्र हे जगातील पहिले आहे.संरक्षण दलात पदार्पण करण्याची संधी मिळताच इच्छुक वीर नारींनी पती निधनाचे दु:ख बाजूला सारून, तसेच अडचणींना न जुमानता मोठ्या जिद्दीने अभ्यास व मेहनत करून भारतीय संरक्षण दलातील प्रवेशासाठी आवश्यक निवड समितीच्या परीक्षा व मुलाखती दिल्या.

त्या उत्तीर्ण झाल्या आणि त्यानंतर कमी कालावधीच्या कार्यासाठीच्या आयोगाचे (शॉर्ट सर्व्हिस कमिशन) ११ महिन्यांचे अतिशय खडतर प्रशिक्षण चेन्नई येथील आर्मी ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी (OTA) मध्ये यशस्वीपणे पूर्ण करून लेफ्टनंट म्हणजे संरक्षण दलातील अधिकृत अधिकारी म्हणून रूजू झाल्या. रविंदर जीत रंधावा या मेजर सुखविंदर जीत सिंग रंधावा यांची पत्नी. सुखविंदर यांना जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यात दहशतवाद्यांशी मुकाबला करत असताना वीरगती प्राप्त झाली. सबिना सिंग यांचे पती हेलिकॉप्टरचे पायलट होते. ते हेलिकॉप्टरच्या एका दुर्घटनेत मृत्युमुखी पडले. रवींदर जीत व सबिना सिंग या दोघींनी संरक्षण दलात दाखल होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुलाखतीत देऊन चेन्नई येथील ११ महिन्यांचे प्रशिक्षण सप्टेंबर १९९८ मध्ये यशस्वीपणे पूर्ण केले आणि लेफ्टनंट पद मिळवले. एप्रिल १९९८ मध्ये वीरगती प्राप्त झालेले सुखविंदर जीत सिंग रंधावा यांना मिळालेला कीर्ति चक्र पुरस्कार त्यांची पत्नी रविंदर जीत या वीर नारीने चेन्नई येथील आपल्या प्रशिक्षणाच्या गणवेशात स्वीकारला.रविंदर जीत रंधावा आणि सबिना सिंग या दोघी पहिल्या वीर नारी आहेत ज्यांनी पतीच्या मृत्यूनंतर स्वतः भारतीय सैन्यात पदार्पण केले. या दोघींची दुर्दम्य इच्छाशक्ती, निर्धार व धाडस यांपासून स्फूर्ती घेऊन अनेक वीर नारी सैन्यात दाखल झाल्या. अशाच आणखी काही शूर वीर नारी सेनानींबद्दल आपण जाणून घेऊ.

## प्रासंगिक »

# आर्थिक आव्हान

***विरोधाभास असा की थेट परकीय गुंतवणुकीत राज्य आघाडीवर; पण विकास मात्र मंदावतो आहे...***

राज्याचा असो वा केंद्राचा. आर्थिक पाहणी अहवाल हा त्यांचा त्यांचा आरसा असतो. महाराष्ट्राचा हा आरसा गेल्या सप्ताहात विधानसभेत सादर केला गेला. सर्वसाधारणपणे आरशासमोर जाणाऱ्यास आपले ध्यान कसे आहे याची कल्पना असते. म्हणजे प्रत्यक्षात बेंगरूळ असलेल्यास आरसा त्याचे रूप राजबिंडे दाखवतो असे होत नाही. अर्थात तरीही स्वत:स तसे मानण्याचा अधिकार प्रत्येकास असतो हे मान्य. पण स्वत:ने स्वत:स कितीही राजहंस मानले तरी इतरांनीही ते मान्य करावे असा आग्रह धरता येत नाही. सबब या आर्थिक पाहणी अहवालाच्या आरशात महाराष्ट्राने स्वत:चे रूप एकदा पाहून घेणे इष्ट. ज्यासाठी हे राज्य ओळखले जात होते मुंबईच्या जिवावर उड्या मारणारे सेवा क्षेत्र बसकण मारून बसलेले, लाडक्या बहिणींच्या ओवाळणीचे कोण कौतुक; पण त्यामुळे या बहिणींच्या एकंदर कल्याणासाठी आवश्यक खर्चात हात आखडता घेण्याची आलेली वेळ इत्यादी अनेक मुद्दे या आर्थिक पाहणीच्या आरशातून समोर येतात.

ग्रामीण महिलांचा एकंदर श्रमशक्तीमधील सहभाग २०१७-१८ पासून सातत्याने वाढतो आहे. यापैकी अनेक महिला स्वयंरोजगार करत आहेत’ असे गेल्या काही वर्षांत खासकरून महिलादिनासारख्या प्रसंगी आवर्जून सांगितले जाते, त्याला आकडेवारीचा आधारही असतो.

# रोजगारात महिलांचा टक्का वाढला

भारत सरकारच्या केंद्रीय सांख्यिकी विभागातर्फे वेळोवेळी श्रम-बल सर्वेक्षणांचे निष्कर्ष प्रकाशित केले जातात, त्यानुसार अगदी यंदासुद्धा देशाच्या श्रमशक्तीत ग्रामीण महिलांचा वाटा वाढलेलाच आहे. अनेक महिला घरगुती स्वरूपाचा उद्योग करत असतात, त्यामुळे त्या स्वयंरोजगारित असतात हेही खरे. पण याचा अर्थ, कमाईसाठी या स्त्रियांना घरकाम व इतर कामे सांभाळून वेळ काढावा लागतो. कुठून मिळवतात ग्रामीण महिला हा वेळ? आणि मग त्यांना स्वत:साठी काही वेळ उरतो का?सरकारच्या याच सांख्यिकी विभागातर्फे एक ‘वेळ- विनियोग सर्वेक्षण’ २०१९ मध्ये केले गेले होते, त्यात स्त्रियांचा सर्वाधिक वेळ स्वयंपाक करण्यातच जातो, हेच स्पष्ट झालेले होते. आम्ही इंदूरलगतच्या ग्रामीण भागात ३००० महिलांचे सखोल सर्वेक्षण केले, दिवसाचे २४ तास त्या कायकाय करतात याविषयीचा शोध घेतला, त्यातून प्रमुख निष्कर्ष असा निघाला की, ग्रामीण महिलांना दर आठवड्याचे ६०



तास घरकामातच घालवावे लागतात, त्यापैकी बराचसा भाग (किमान ४० तास) हा स्वयंपाकात किंवा एकंदर ‘रांधा-वाढा- उष्टी काढा’ यातच जातो. याचा अर्थ दिवसाला कमीत कमी चार तास, म्हणजे एखाद्या ‘पार्ट टाइम जॉब’च्या इतकाच वेळ. त्यातही, यापैकी ७५ टक्के महिलांना स्वयंपाकासाठी शेण्या बनवून वाळत घालण्याचे किंवा लाकूडफाटा जमवण्याचे कामही करावेच लागते. यामुळे स्वयंपाकाचा आणि चुलीच्या सफाईचाही वेळ वाढतो, शिवाय फुफ्फुसाचे आजारही होतात. ‘प्रधान मंत्री उज्वला योजना’ २०१६ लागू झाल्यानंतर इतक्या वर्षांनीही या महिलांना लाकूडफाटाच जमवावा लागतो आहे आणि धुराच्या चुलीवरच स्वयंपाक रांधावा लागतो आहे, हा झाला एक भाग. पण अशा चुलीवरच्या स्वयंपाकात बऱ्याचदा एकाच घरच्या अनेक स्त्रिया (सासू-सून, भावजयी इत्यादी) गुंतलेल्या राहातात. यापैकी प्रमुख भूमिकेत असलेल्या महिलांनाच ‘आत्ता जे जेवण रांधले त्याला किती वेळ लागला’ असा प्रश्न आमच्या सर्वेक्षणात विचारला गेला. उत्तरदात्यांमध्ये काही जणी गॅस वापरणाऱ्याही होत्या. त्यांच्या उत्तरांमधून असे स्पष्ट झाले की, जेवणाचे पदार्थ फक्त रांधण्यासाठीचा वेळ गॅसपेक्षा चुलीवर किमान ३० मिनिटे अधिक असतो.चूल वापरणाऱ्या बहुतेक महिलांचा कल शेणाच्या गोवऱ्यांवर स्वयंपाक करण्याकडे दिसला. या गोवऱ्यांसाठी शेण उचण्यापासून ते गोवऱ्या थापण्या- काढण्यापर्यंतच्या कामासाठी आठवड्याला या महिलांची किमान ७० मिनिटे खर्ची पडतात. लाकूडफाटा जमवण्याचे काम आठवड्यातून एखादेवेळी, किंवा महिन्यातून चारदा आम्ही करतो, असे या महिलांनी सांगितले.

## ।। अभंगवाणी ।।




आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### मध्यम स्थितीतली माणसे संगतीला चांगली

एका गावात चोरांची एक सभा भरली. तीत काही चोर म्हणाले की, लूट करायची ती हानी करून करावी; तर काहींचे असे म्हणणे पडले की, कुणाला उगीच मारायला नको, नुसतीच लूट करावी; पण लूट करावी असे सर्वांचेच ध्येय होते ! तसे आपले होते. एक म्हणतो, व्यवहारदृष्ट्या प्रपंच करावा; दुसरा म्हणतो, तसे नव्हे, योग्य-अयोग्य पाहून प्रपंच करावा; तर तिसरा म्हणतो, स्वतःचा स्वार्थ साधून प्रपंच करावा; परंतु देवाचे अधिष्ठान ठेवून प्रपंच करावा असे कुणीच म्हणत नाही ! सगळ्यांना प्रपंच 'हवा' आणि देव असला तरी चालेल. म्हणजे प्रपंच तेवढा खरा असे ते मानून चालतात, देवाविषयी मात्र त्यांच्या मनात संशय असतो. वृत्ती कितीही अस्थिर असलेली त्यांना चालते. दारू पिऊन बेहोश झालेला माणूस मनाला येईल ते गाणे गातो. असा एक दारुडा गाणे गात असताना दुसरा दारुडा त्याला म्हणू लागला की, 'अरे, हे असले गाणे काय म्हणतोस ? तुला काही कळत नाही.' नंतर काही वेळाने तोच प्रश्न पहिल्या दारुड्याने दुसऱ्या दारुड्याला विचारला ! त्याप्रमाणे, प्रपंचामध्ये ज्यांची वृत्ती स्थिर नाही अशा लोकांनी वाटेल ती मते प्रतिपादन करावीत असे घडते आणि मग ते एकमेकांना नावे ठेवतात. आपला प्रपंचातला व्यवहार हा असा असतो.

'आम्हाला बंधने नकोत' असे म्हणणारे लोक वेडेच समजले पाहिजेत. समाज हा बंधनांशिवाय राहू शकत नाही. खरोखर, नोकरीमध्ये फार त्रास नसेल तर ती मालकाइतकीच सुखाची असते; उलट कित्येक वेळा मालकीमध्येच फार त्रास असतो. व्यवहारामध्ये आपण दुसऱ्याची लबाडी ओळखून वागावे एवढीच लबाडी आपल्यामध्ये असावी. पण स्वतः लबाडी करू नये; म्हणजेच, आपले डावपेच किंवा लबाडी लोकांना फसविण्यासाठी नसावी. लोकांकडून न फसण्याइतकेच आपण व्यवहारी असावे. व्यवहाराच्या दृष्टीने बघितले तर मला मध्यम स्थितीतली माणसेच जास्त भेटली. ती व्यवहाराला आणि संगतीला फार चांगली असतात, कारण ती सर्व बाजूंनी मध्यम असतात; त्यांचे पाप मध्यम, पुण्य मध्यम आणि परमार्थदेखील मध्यमच असतो. असा मनुष्य वेळप्रसंगी कर्जबाजारी झाला तरी चालतो पण कर्ज किती असावे, तर या महिन्यात देऊन टाकता येईल इतकेच.

**बोधवचन:- नीतिधर्माचे आचरण ठेवता यावे, मुलाबाळांचे रक्षण करता यावे, अब्रुने जगता यावे, इतका पैसा जवळ असला की तो मनुष्य श्रीमंत समजावा.**

# टवाळखोर, वाचाळवीरांच्या मुसक्या योग्य वेळी आवळा!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**आपल्या महाराष्ट्रात सध्या टवाळखोरांचं, वाचाळवीरांचं अमाप पीक उगवलंय. ही पैदास वेळीच ठेचली गेली नाही, तर राज्यात अराजक माजेल, अशी अवस्था आहे.. या वाचाळ वीरांच्या मुसक्या वेळीच आवळायला हव्यात. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांना एवढीच एक मनापासून विनंती आहे, की यांच्या नांग्यावेळीच ठेचा, नाहीतर पूर्वीच्या सरकारांमध्ये आणि तुमच्यामध्ये काहीच फरक नाही, हे जनतेच्या लक्षात येईल !**



हे बघा ना, हल्ली कोणीही सोम्यागोम्या उठतो आणि महापुरुषांबाबत अर्वाच्य बोलतो, महापुरुषांचा अवमान करतो, अपमान करतो..आणि मग आहेच.. बिळात बसलेले नागोबा बाहेर पडतात आणि सरकारला धारेवर धरतात, मुख्यमंत्र्यांची जात काढतात..उघडपणे भिडण्याची कुणाचीही लायकी नसते, पण भाषा पंडित असल्यामुळं त्यांची चलती असते आणि मीडियाला तेच हवं असतं, हे नक्की !

### टार्गेट : वन अँड ओन्ली मुख्यमंत्री !

आपल्या विधानामुळं काहूर माजेल, याची त्यांना तमा नसते.किंबहुना,रणकंदन माजावे,अशीच त्याची इच्छा असते. मग, तो या सगळ्या वाचाळवीरांचे राजकीय पक्ष वेगळे आहेत पण टार्गेट एकच आहे.. मुख्यमंत्री!

### या विषवल्ली ठेचा होऽऽ..

या साऱ्या विषवल्ली आहेत, त्यांना वेळीच ठेचायला हवं एवढाच सल्ला आपण देऊ शकतो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जिथं जिथं मराठी माणूस आहे तिथं त्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे वंदनीय आणि आदरणीय आहेतच. पण, कोणी तरी येतो आणि त्यांच्याबद्दल काहीतरी बरळून जातो, ही आजकालची 'फॅशन' बनली आहे. त्यामुळं, विनाकारण समाजात दुहीची आणि द्वेषाची बीज पेरली जात आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

### या नतद्रष्टांनादंगली हव्यात का?

महापुरुषांची विटंबना असो अथवा त्यांच्याबाबत केलेली आक्षेपार्ह विधानं असोत, त्यामुळं राज्यातच नव्हे तर देशात अनेक ठिकाणी गंभीर स्वरुपाच्या दंगलीसुद्धा झाल्या आहेत. त्यामुळं सामाजिक वातावरण बिघडण्यास मदतच झाली आहे. या टवाळखोरांना तीच परिस्थिती पुन्हा आणायची आहे का? काही दिवसांपूर्वी राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर यांनी जी काही विधानं केली, ती करण्याची वेळही नव्हती आणि काहीच गरज नव्हती. पण, बोलण्याच्या भरात ते भरकटत गेले आणि आपण महापुरुषांचा अपमान करत आहोत, याचे त्यांना भानच राहिलं नाही.

### महापुरुषांना जातीजातीत विभागलं

मुळात गेल्या काही वर्षांत सर्वच महापुरुष आपापल्या जातीमध्ये दुर्दैवानं विभागले गेले आहेत, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. काही दिवसांपूर्वी अशा वाचाळवीरांमध्ये समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी सामील झाले. त्यांनी मुघल बादशहा औरंगजेब हा सर्वोत्कृष्ट प्रशासक होता आणि त्याच्या कारकीर्दीमध्ये सारे काही 'आलबेल' होते, त्याने अनेक मंदिरे उभारली, अशा प्रकारचं विधान केलं. औरंगजेबाचं उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न चांगलाच भोवला आहे. आझमीच्या विरोधात संताप व्यक्त केला जात होता, त्याचे पडसाद विधिमंडळातही उमटले, हे अवघ्या जगानं पाहिलं. त्यानंतर अबू आझमीचं विधान सभेतून निलंबन झालं.

महापुरुषांचा त्याचप्रमाणं छत्रपतींचा अवमान करणाऱ्यांना सोडणार नाही, त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. छत्रपतींचा अवमान करणाऱ्यांना शंभर टक्के गजाआड टाकू, असे सांगून फडणवीस पुढे म्हणाले, की महापुरुषांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या प्रशांत कोरटकरने अटकपूर्व जामीन मिळवला आहे, पण त्याविरोधात आम्ही उच्च न्यायालयात जाऊ.

### कोरटकर चिल्लर, कारवाई कधी?

कोरटकर वगैरे चिल्लर माणसं आहेत, जितेंद्र आव्हाड काय बोलले, त्याचा विरोधकांनी निषेध केला नाही. औरंगजेब होता, म्हणून शिवाजी महाराजांना ओळखले जाते. औरंगजेब किती बलाढ्य होता आणि शिवाजी महाराज पाच फुटांचे होते, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले होते, हे लक्षात घ्यायला हवं.

### आक्रमक मुख्यमंत्र्यांचं चॅलेंज..

माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' मधून छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या लिखाणाचा निषेध करणार का? असा सवाल मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना केला.त्यावर विरोधक गप्प बसले.

### आझमी यांचं धक्कादायक वक्तव्य!

सध्या 'छावा' चित्रपटाच्या निमित्तानं महाराष्ट्रात छत्रपती संभाजी महाराजांबद्दल जो आदरभाव वृद्धिंगत झाला आहे, त्याला धक्का देणारे वक्तव्य अबू आझमींनी केलं आहे. संभाजी राजांवर अत्यंत क्रूर पद्धतीनं अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाचे कोडकौतुक करणारे नेते महाराष्ट्रात आहेत, ही अत्यंत लांच्छनास्पद गोष्ट आहे.

या आधीसुद्धा छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमचे नेते ओवैसी यांनी भर सभेमध्ये औरंगजेबाचं अशाच प्रकारे गुणगान केलं होतं. ज्या महापुरुषांबद्दल साऱ्यांच्या मनात आदरभाव आहे, त्यांना गंभीर दुखापत करणारे औरंगजेबासारखे क्रूर बादशहा आदर्श कसे असू शकतात ? महापुरुषांबाचत आक्षेपार्ह विधाने करणाऱ्यांना योग्य शिक्षा देण्याची तयारी सरकारनं ठेवली पाहिजे.

### एक भंपक बोलतो, फटका दुसऱ्याला..

कोणीतरी एकानं केलेल्या चुकीच्या विधानाचा फटका संपूर्ण समाजाला बसण्याचा धोकाही लक्षात घ्यायला हवा, असे विषय पेटणार नाहीत, याचीही काळजी घ्यायला हवी. अशा वाचाळवीरांवर कडक कारवाई करण्याची अत्यंत गरज आहे.

चांगला प्रशासक होण्यासाठी खूप चांगली कामं करावी लागतात. पण, क्रूर कामे करणारा कधीच चांगला प्रशासक होऊ शकत नाही. अबू आझमीना चांगल्या प्रशासकाबद्दलचे आपले मत बदलावे लागेल, प्रसंगी, बडगा उगारून ते समजावून सांगावं लागेल !

# संघाचे लोक गच्चीवरून देशप्रेम शिकवतात!

## उद्धव ठाकरेंचं पदाधिकारी मेळाव्यात घणाघाती भाषण

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उद्धव ठाकरे यांनी ईशान्य मुंबई पदाधिकारी निर्धार मेळाव्यातून मुंबई आपल्याला जिंकायचीच आहे म्हणत महापालिका निवडणुकीचं रणशिंगच फुंकलं आहे. यावेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपावर जोरदार टीका केली. तसंच एकनाथ शिंदेंनी त्यांच्या शिवसेनेचं नाव शिवसेना अमित शाह असं ठेवावं असाही टोला लगावला.**



“आम्ही मोहन भागवतांचे फॉलोअर आहोत. मोहन भागवतच कुंभमेळ्यात गेले नाहीत तर आम्ही कसे जाणार? असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. पुढे ते म्हणाले, ‘छावा’ चित्रपट आला. त्यामध्ये भाजपाच्या लोकांचं कर्तृत्व काय? तुमचा काय संबंध? तरीही त्याबद्दल बोलत आहेत. माझं भाजपावाल्यांना सांगणं आहे की अनाजी पंताने भगव्याला डाग कसा लावला हे बघायचं असेल तर जरुर जा.स्वातंत्र्य लढ्यामध्ये काडीचाही संबंध नाही अशा लोकांच्या हाती आज देशाची सूत्रं आहेत. पाकिस्तानविरोधात युद्ध सुरू झाले तर हे गच्चीतून देशप्रेम शिकवतात असा टोला उद्धव ठाकरे यांनी आरएसएस आणि भाजपला लगावला. दैवतांवरून भांडण लावणारे आता भाषेच्या मुद्द्यावरून वाद निर्माण करत आहेत असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला. पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांनी भाषण करत मुंबई आपल्याला जिंकायची आहे असा निर्धार तुम्ही सगळ्यांनी करा असंही आवाहन केलं.संघाच्या भैयाजी जोशी यांनी मराठी भाषेवरून केलेल्या वक्तव्याचा समाचार उद्धव ठाकरेंनी घेतला. ते म्हणाले की, “गुजरातबद्दल आम्हाला द्वेष नाही. पण हे लोक आता भाषिक प्रांतवाद सुरू करत आहेत. देशामध्ये आम्ही हिंदू आहोत, तर महाराष्ट्रात आम्ही मराठी आहोत बरं हे काही माझं सांगणं नाही. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंनीच हे सांगितलं होतं. आता हे जोशी घाटकोपरची भाषा गुजराती म्हणतात. आम्हाला शिकवू नका. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही यांनी फूट पाडण्याचंच काम केलं.” असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला.राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई येथे पदाधिकाऱ्यांच्या निर्धार शिबीरादरम्यान आज भाजपा आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली आहे. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळातील काही निर्णयांना स्थगिती दिल्याच्या मुद्द्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामांना स्थगिती देण्यासाठी मी काही उद्धव ठाकरे नाही, अशी खोचक प्रतिक्रिया दिली होती. यानंतर आता उद्धव ठाकरेंनी फडणवीसांना प्रत्युत्तर दिलं आहे. तुम्ही उद्धव ठाकरे होऊच शकत नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले.करोना काळात मी काम बंद पडू दिलं नव्हतं. मेट्रोची कामे मी बंद पडू दिली नव्हती. कोस्टल रोडचं काम बंद पडू दिलं नव्हतं. रुग्णालयात देखील ज्या तुम्हाला कधी आयुष्यात जमल्या नसत्या एवढ्या सेवा सुविधा आम्ही महाराष्ट्राला उपलब्ध करून दिल्या होत्या. फक्त तुमच्या मालकांच्या मित्रांची हुजरेगिरी मी केली नाही म्हणून ‘मी उद्धव ठाकरे नाही’ म्हणालात ना, तुम्ही उद्धव ठाकरे नाहीच आहात आणि होऊ शकतच नाहीत,” असं उद्धव ठाकरे म्हणाले.“आम्ही मोहन भागवतांचे फॉलोअर आहोत. मोहन भागवतच कुंभमेळ्यात गेले नाहीत तर आम्ही कसे जाणार? असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. पुढे ते म्हणाले, ‘छावा’ चित्रपट आलातुमचा काय संबंध? तरीही त्याबद्दल बोलत आहेत. माझं भाजपावाल्यांना सांगणं आहे की अनाजी पंताने भगव्याला डाग कसा लावला हे बघायचं असेल तर जरुर जा.स्वातंत्र्य लढ्यामध्ये काडीचाही संबंध नाही अशा लोकांच्या हाती आज देशाची सूत्रं आहेत.

### काय म्हणाले उद्धव ठाकरे?

पाकिस्तानविरोधात युद्ध सुरू झाले तर हे गच्चीतून देशप्रेम शिकवतात असा टोला उद्धव ठाकरे यांनी आरएसएस आणि भाजपला लगावला. दैवतांवरून भांडण लावणारे आता भाषेच्या मुद्द्यावरून वाद निर्माण करत आहेत असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला. पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांनी भाषण करत मुंबई आपल्याला जिंकायची आहे असा निर्धार तुम्ही सगळ्यांनी करा असंही आवाहन केलं.संघाच्या भैयाजी जोशी यांनी मराठी भाषेवरून केलेल्या वक्तव्याचा समाचार उद्धव ठाकरेंनी घेतला. ते म्हणाले की, “गुजरातबद्दल आम्हाला द्वेष नाही.

# भाजपकडून निवडणुकीची प्रक्रिया सुरू!

## नांदेड जिल्ह्यात तीन निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या धामधुमीतच भाजपाच्या प्रदेश कार्यालयाने पक्षाच्या ७८ संघटनात्मक जिल्ह्यांतील निवडणुकीची प्रक्रिया सुरू केली आहे. नांदेड जिल्ह्यातील प्रक्रियेत नव्यांना स्थान न देता जुन्या-निष्ठावान कार्यकर्त्यांना निवडणुका पार पाडण्याचा मान देण्यात आला आहे.**



सोळा तालुक्यांत पसरलेल्या नांदेड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागासाठी उत्तर व दक्षिण नांदेड हे दोन स्वतंत्र संघटनात्मक जिल्हे असून त्यांतील निवडणुकीची जबाबदारी अनुक्रमे चैतन्यबापू देशमुख व रामराव केंद्रे या अनुभवी कार्यकर्त्यांवर तर नांदेड महानगरमधील जबाबदारी परभणीच्या प्रमोद वाकोडकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या निवडणुकीच्या अधिकाऱ्यांना प्रथम १० ते २० मार्च दरम्यान बूथ अध्यक्षांची आणि नंतर ३० मार्चपर्यंत मंडल अध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगण्यात आले असले, तरी पक्षस्तरावर मंडल समित्यांच्या पुनर्रचनेचा विषय विचाराधीन आहे, पण तो अंतिम होण्यापूर्वीच निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली.पक्षाच्या संघटनात्मक निवडणुकीच्या संदर्भाने विभागीय संघटनमंत्र्यांनी गेल्या शनिवारी सर्व संबंधितांची बैठक नांदेडमध्ये घेतली. त्यात आवश्यक ते नियोजन करण्यात आले. सुमारे ५ वर्षांपूर्वी पक्षाच्या संघटनात्मक निवडणूक प्रक्रियेत तत्कालीन खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांचा प्रभाव दिसला होता. आता नांदेड उत्तर जिल्ह्यातल्या संघटनात्मक निवडणुकीत खा.अशोक चव्हाण यांचा गट आणि पक्षाचे जुने कार्यकर्ते यांच्यात समन्वय राखला जातो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मागील वर्षी भाजपामध्ये प्रवेश केला. त्याआधी त्यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद भूषविले होते.तसेच नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष संघटनेत त्यांचे एकहाती निर्विवाद वर्चस्व प्रदीर्घकाळ दिसून आले. पण भाजपात आल्यानंतर त्यांना नांदेड जिल्ह्याच्या पक्ष संघटनेत आतापर्यंत महत्त्व दिले गेले नाही. ते भाजपामध्ये आल्यावर प्रथमच पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका होत असून भोकर, मुदखेड आणि अर्धापूर तालुक्यातील मंडळ अध्यक्ष निवडणुकांत त्यांच्या गटाला किती वाव मिळणार, ते पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.भाजपाच्या नांदेड दक्षिण जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात आठ तालुके व पक्षाचे तीन आमदार आहेत.

### आता कोणाला पसंती दिली जाते

मागील काही वर्षे डॉ.संतुक हंबर्डे यांनी या संघटनात्मक जिल्ह्याचे अध्यक्षपद भूषविले. त्यांच्या जागी आता कोणाला पसंती दिली जाते, याकडे संबंधितांचे लक्ष असले, तरी नांदेड उत्तर जिल्ह्याचे अध्यक्षपद कोणाला मिळणार, याबद्दल अधिक उत्सुकता आहे. हे जिल्हाध्यक्षपद माहूर-किनवट भागाकडे दिले जावे

# सीरियात पुन्हा हिंसाचार!

## दोन दिवसांत एक हजारांपेक्षा जास्त नागरिक ठार

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**सीरियात गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात तीव्र संघर्ष सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. या संघर्षात दोन दिवसांत तब्बल १ हजारांपेक्षा जास्त जण ठार झाले असल्याची माहिती सांगितली जाते. सीरियातील हा संघर्ष गेल्या १४ वर्षांच्या संघर्षातील सर्वात घातक ठरला असल्याचं म्हटलं जात आहे. सीरियात सध्या सुरु असलेला हा संघर्ष सीरियन सुरक्षा दल आणि पदच्युत अध्यक्ष बशर अल असद यांच्या समर्थकांमध्ये सुरु आहे.**



सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राईट्सच्या मते हिंसाचाराचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिकांना बसला आहे. काही लोकांना जवळून गोळ्या घालण्यात आल्या आहेत. या गोळीबारात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच अनेक ठिकाणी या संघर्षामुळे वीज आणि पाणी खंडित करण्यात आलेलं आहे. एवढंच नाही तर या संघर्षात आणखी रक्तपात होण्याच्या भीतीने हजारो लोक सुरक्षित ठिकाणी पळून गेले असल्याची माहिती सांगितली जाते. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.काही महिन्यांपूर्वी बशर अल असद देश सोडून पळून गेल्यानंतर सत्तेवर आलेल्या नवीन सरकारसमोर आता संघर्षाचं मोठं आव्हान निर्माण झालं आहे. दरम्यान, या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सरकारी दलांचं म्हणणं आहे की, बशर अल असदच्या समर्थकांकडून होणाऱ्या हल्ल्यांना प्रत्युत्तर दिल्यानंतर हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढला. यामध्ये सूड उगवणाऱ्याही काही घटना घडल्या. काही सुन्नी बंदूकधाऱ्यांनी असदच्या गटाला पाठिंबा देणाऱ्यांना लक्ष्य केलं. काही प्रत्यक्षदर्शींनी या संपूर्ण परिस्थितीच्या भयानक दृश्यांचं वर्णन केलं आहे. रस्त्यावर मृतदेह पडले होते आणि घरे जळाली होती. काही माणसांना त्यांचं ओळखपत्र तपासल्यानंतर मारलं जात होतं. या संघर्षाच्या भितीने काही लोक जवळच्या डोंगरात पळून गेले, तर काहींनी ह्मीमिममधील रशियन हवाई तळावर आश्रय घेतला आहे. अद्यापही सीरियात मोठ्या प्रमाणात तणाव आहे. अनेक ठिकाणी लूटमार आणि जाळपोळीच्या घटना घडल्या आहेत. दरम्यान, समोर आलेल्या वृत्तानुसार या हिंसाचारात एक

### लोक जवळच्या डोंगरात पळून गेले

काही सुन्नी बंदूकधाऱ्यांनी असदच्या गटाला पाठिंबा देणाऱ्यांना लक्ष्य केलं.काही प्रत्यक्षदर्शींनी या संपूर्ण परिस्थितीच्या भयानक दृश्यांचं वर्णन केलं आहे. रस्त्यावर मृतदेह पडले होते आणि घरे जळाली होती. काही माणसांना त्यांचं ओळखपत्र तपासल्यानंतर मारलं जात होतं. या संघर्षाच्या भितीने काही लोक जवळच्या डोंगरात पळून गेले

हजाराहून अधिक लोक मारले गेले आहेत. सीरियात गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात तीव्र संघर्ष सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. या संघर्षात दोन दिवसांत तब्बल १ हजारांपेक्षा जास्त जण ठार झाले असल्याची माहिती सांगितली जाते. सीरियातील हा संघर्ष गेल्या १४ वर्षांच्या संघर्षातील सर्वात घातक ठरला असल्याचं म्हटलं जात आहे. सीरियात सध्या सुरु असलेला हा संघर्ष सीरियन सुरक्षा दल आणि पदच्युत अध्यक्ष बशर अल असद यांच्या समर्थकांमध्ये सुरु आहे. यापैकी ७४५ नागरिकांपैकी बहुतेकांना जवळून गोळ्या घालून ठार करण्यात आलं. एवढंच नाही तर या संघर्षात आणखी रक्तपात होण्याच्या भीतीने हजारो लोक सुरक्षित ठिकाणी पळून गेले असल्याची माहिती सांगितली जाते. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.काही महिन्यांपूर्वी बशर अल असद देश सोडून पळून गेल्यानंतर सत्तेवर आलेल्या नवीन सरकारसमोर आता संघर्षाचं मोठं आव्हान निर्माण झालं आहे. दरम्यान, या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सरकारी दलांचं म्हणणं आहे की, बशर अल असदच्या समर्थकांकडून होणाऱ्या हल्ल्यांना प्रत्युत्तर दिल्यानंतर हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढला. यामध्ये सूड उगवणाऱ्याही काही घटना घडल्या.

---

# अमेरिकेत पुन्हा एकदा हिंदू मंदिराची विटंबना

## चिनो हिल्समध्ये मंदिराची विटंबना झाली असल्याची माहिती

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**अमेरिकेत पुन्हा एकदा हिंदू मंदिराची विटंबना करण्यात आली आहे. कॅलिफोर्नियात चिनो हिल्स येथे असलेल्या श्री स्वामीनारायण मंदिरात या मंदिराची विटंबना करण्यात आली. याविरोधात आता परराष्ट्र मंत्रालयानेही निषेध नोंदवला असून स्थानिक अधिकाऱ्यांना कठोर कारवाई आवाहन करण्यात आल्याचं परराष्ट्र मंत्रालयाने कळवलं आहे.**



शनिवारी बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेने (बीएपीएस) याबाबत सोशल मीडियावर एक निवेदन जारी केले होते. त्यात त्यांनी म्हटलंय की, चिनो हिल्समध्ये असलेल्या श्री स्वामीनारायण मंदिराची विटंबना झाली आहे.तसंच, या घटनेनंतर BAPS पब्लिक अफेयर्स टीमनेही याविरोधात निषेध नोंदवला. त्यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, "सीएच्या चिनो हिल्समध्ये झालेल्या आणखी एका मंदिराच्या अपवित्रतेच्या पार्श्वभूमीवर, हिंदू समुदाय द्वेषाविरुद्ध ठाम आहे. चिनो हिल्स आणि दक्षिण कॅलिफोर्नियामधील समुदायासोबत, आम्ही कधीही द्वेषाला थारा देणार नाही."मंदिर विटंबनेची दखल परराष्ट्र मंत्रालयाने घेतली आहे. त्यांनी म्हटलंय, "आम्ही अशा घृणास्पद कृत्यांचा तीव्र शब्दात निषेध

### हिंदू समुदाय द्वेषाविरुद्ध ठाम

त्यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, "सीएच्या चिनो हिल्समध्ये झालेल्या आणखी एका मंदिराच्या अपवित्रतेच्या पार्श्वभूमीवर, हिंदू समुदाय द्वेषाविरुद्ध ठाम आहे. चिनो हिल्स आणि दक्षिण कॅलिफोर्नियामधील समुदायासोबत, आम्ही कधीही द्वेषाला थारा देणार नाही."मंदिर विटंबनेची दखल परराष्ट्र मंत्रालयाने घेतली आहे.

करतो. आम्ही स्थानिक कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांना या कृत्यांसाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याचे आणि प्रार्थनास्थळांना पुरेशी सुरक्षा सुनिश्चित करण्याचे आवाहन करतो.गेल्या वर्षी, कॅलिफोर्नियातील सॅक्रामेंटो येथील BAPS हिंदू मंदिर आणि न्यू यॉर्कमधील मेलव्हिल येथील BAPS श्री स्वामीनारायण मंदिराची खूप विटंबना झाली होती. शनिवारी बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेने (बीएपीएस) याबाबत सोशल मीडियावर एक निवेदन जारी केले होते. त्यात त्यांनी म्हटलंय की, चिनो हिल्समध्ये असलेल्या श्री स्वामीनारायण मंदिराची विटंबना झाली आहे.तसंच, या घटनेनंतर BAPS पब्लिक अफेयर्स टीमनेही याविरोधात निषेध नोंदवला.

# शाहरूखचा 'दिल तो पागल है' मधील गाण्यावर डान्स

बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील असे अनेक सिनेमे आहेत, ज्यांचे आजही लाखो चाहते असल्याचे पाहायला मिळते. काही चित्रपट, काही गाणी, काही कलाकारांच्या जोड्या या प्रेक्षकांच्या जवळच्या असल्याचे पाहायला मिळते. आजही ९० च्या दशकातील अनेक चित्रपटांचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यामधील एक म्हणजे 'दिल तो पागल है' हा चित्रपट आहे. या सिनेमातील 'कोई लडकी है' हे गाणेदेखील मोठ्या प्रमाणात गाजल्याचे पाहायला मिळाले होते. शाहरूख खान(SHAH RUKH KHAN) व माधुरी दीक्षित(MADHURI DIXIT)च्या जोडीने प्रेक्षकांना वेड लावले होते. आता पुन्हा एकदा ही जोडी कोई लडकी है या गाण्यावर एकत्र थिरताना दिसली आहे. जयपूरमध्ये सध्या आयफा पुरस्कार सोहळा २०२५ सुरू आहे. या पुरस्कार सोहळ्यात अनेक दिग्गज कलाकारांनी हजेरी लावली आहे. या कार्यक्रमातील काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. नुकताच शाहिद कपूर व करीना कपूर यांनी एकमेकांशी संवाद साधला, गळाभेट घेतली असा एक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. या व्हिडीओमध्ये शाहरूख खानने काळ्या रंगाचे कपडे परिधान केल्याचे दिसत आहे, तर माधुरी दीक्षितने काळ्या व पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केल्याचे पाहायला मिळत आहे. त्यांनी कोई लडकी है या गाण्याची हूक स्टेप केली आहे. आता या धमाकेदार डान्सनंतर चाहते त्यांचे कौतुक करताना दिसत आहेत. अनेकांनी म्हटले आहे की, त्यांचे वय वाढत नाहीये; तर काहींनी म्हटले की त्यांचा ९० च्या दशकातील बॉण्ड खूप आवडला, असे म्हणत त्यांचे कौतुक केले आहे.शाहरूख खान आयफा पुरस्कार सोहळ्यासाठी शुक्रवारी पोहोचला आहे. जयपूरच्या विमानतळावर चाहत्यांनी त्याला भेटण्यासाठी गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. शाहरूख खानची मॅनेजर पूजा ददलानीने सोशल मीडियावर किंग खानचा एक फोटो शेअर केला.

# गोविंदाने 18 कोटींची ऑफर नाकारली

९० च्या दशकात बॉलीवूड गाजवणारा अभिनेता गोविंदा(GOVINDA) गेल्या काही दिवसांपासून त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला होता. सुनिता आहुजा व गोविंदा यांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, सहा महिन्यांपूर्वी सुनिता आहुजाने घटस्फोटासाठी अर्ज केला होता. मात्र, सध्या त्यांच्यात सर्व काही सुरळित असल्याचे गोविंदाच्या वकिलाने स्पष्ट केले आहे. आता मात्र, अभिनेता गोविंदा वेगळ्याच कारणाने चर्चेत आहे. अभिनेत्याने नुकतीच मुकेश खन्ना यांच्या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याने विविध विषयांवर गप्पा मारल्या. तसेच त्याने जेम्स कॅमेरून यांनी त्याला १८ कोटी रूपयांची ऑफर दिली होती. तसेच अवतार या चित्रपटात त्याला प्रमुख भूमिकेची ऑफर दिली होती, असाही खुलासा केला आहे.गोविंदाने मुकेश खन्ना यांच्या युट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत म्हटले, "मी अमेरिकेत एका सरदारजींना भेटलो होतो. मी त्यांना व्यवसाय करण्याची एक कल्पना दिली. ती कल्पना यशस्वी ठरली. काही वर्षांनंतर त्यांनी मला जेम्स कॅमेरूनला भेटायला लावले. त्यांनी मला जेम्स कॅमेरूनबरोबर चित्रपटात काम करण्याचे सुचवले. म्हणून मी जेम्स कॅमेरून यांना चर्चा करण्यासाठी जेवणासाठी आमंत्रित केले. त्यावेळी मी त्यांना चित्रपटाचे अवतार हे शीर्षक सुचवले. जेम्सने कॅमेरून यांनी मला सांगितले की चित्रपटातील नायक अपंग आहे. त्यामुळे चित्रपटात काम करण्यास नकार दिला. त्यांनी मला त्यासाठी १८ कोटी रुपयांची दिली आणि मला ४१० दिवसांसाठी शूटिंग करावे लागेल, असे सांगितले. मी म्हणालो की ते ठीक आहे, पण जर मी माझे शरीर रंगवले तर मी रुग्णालयात असेन."पुढे गोविंदाने म्हटले, "आपले शरीर व्यक्त होण्याचे सगळ्यात महत्वाचे एकमेव साधन असते. अनेकदा काही गोष्टी व्यावसायिकदृष्ट्या खूप आकर्षक दिसतात. परंतु त्याचे तुमच्या शरीरावर होणारे परिणाम देखील पाहावे लागतात. बऱ्याचदा चित्रपटाला नकार दिल्याबद्दल तुम्हाला वर्षानुवर्षे लोकांची माफी मागत राहावे लागते.



# जर लोकांना छान वाटलं असेल

शाहिद कपूर(SHAHID KAPOOR) व करीना कपूर खान( KAREENA KAPOOR KHAN) हे बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकार आहेत. त्यांच्या चित्रपटांमुळे ते सातत्याने चर्चेत येत असतात. करीना व शाहिद यांनी अनेक चित्रपटांत एकत्र काम केले आहे. 'जब वी मेट' या चित्रपटातील त्यांची पात्रे आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहेत. गीत व आदित्य यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना प्रचंड आवडली होती. याबरोबरच ते अनेक वर्षे रिलेशनशिपमध्येदेखील होते. मात्र, कालांतराने त्यांचे ब्रेकअप झाले. १८ वर्षांपूर्वी त्यांचं ब्रेकअप झाले होते, आता नुकत्याच एका सोहळ्यादरम्यान त्यांनी एकमेकांची भेट घेतल्याचे पाहायला मिळाले. आयफा अवॉर्ड सोहळ्यात अनेक कलाकारांनी हजेरी लावली आहे. शाहिद कपूर, करीना कपूर, करण जोहर, कार्तिक आर्यन, क्रिती सेनॉन असे अनेक कलाकार सोहळ्यात दिसले. यावेळी करीना व शाहिद यांची भेट झाली. त्यांनी एकमेकांना मिठी मारत भेट घेतली. तसेच, त्यांच्यात बराच वेळ संवाद चालू असल्याचे समोर आलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळाले. हे व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. चाहत्यांनी त्याच्यावर कमेंट्स करीत कौतुक केले. 'जब वी मेट'मधील गीत व आदित्यला अनेक वर्षांनंतर एकत्र पाहून चाहत्यांना आनंद झाला असल्याचे पाहायला मिळाले. आता शाहिद कपूरने करीना कपूर खानच्या भेटीनंतर त्यावर वक्तव्य केले आहे.नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने करीनाबरोबरच्या भेटीवर बोलताना म्हटले, "आमच्यासाठी हे नवीन नाही, आज स्टेजवर भेटलो आहे, आम्ही इतर ठिकाणीदेखील भेटत असतो. पण, आमच्यासाठी खूप नॉर्मल आहे, जर लोकांना छान वाटलं असेल तर ते छान आहे", असे म्हणत करीनाच्या भेटीवर अभिनेत्याने प्रतिक्रिया दिली .





विकी कौशल, रश्मिका मंदाना यांचा 'छावा' चित्रपट अजूनही बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई करत आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' चित्रपटाला २० दिवसांनंतरही प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेल्या 'छावा' चित्रपट हा २०२५ मधला ५०० कोटींहून अधिक कमाई करणारा पहिला चित्रपट ठरला आहे. २३व्या दिवशीदेखील 'छावा' चित्रपटाने बक्कळ कमाई केली आहे. व्हॅलेंटाइन डे दिवशी १४ फेब्रुवारीला 'छावा' चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणाऱ्या विकी कौशलने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. अजूनही प्रेक्षक 'छावा' चित्रपट बघण्यासाठी चित्रपटगृहात गर्दी करताना दिसत आहेत.

# छावा'चीघोडदौड सुरूच

# शाहरूखसह दोन अभिनेत्यांना नोटीस

चित्रपट, मालिका, वेब सीरिजमध्ये दिसणारे अनेक कलाकार हे विविध उत्पादनांच्या जाहिरातींमध्ये काम करताना दिसतात. मग ती सौंदर्य प्रसाधने असो वा खाण्याचे पदार्थ असोत. यामध्ये बॉलीवूडचा किंग खान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहरूख खानचादेखील समावेश आहे. आता मात्र एका जाहिरातीमुळे शाहरूख खानला नोटीस बजावण्यात आली आहे. शाहरूख खान, ही जाहिरात चुकीची माहिती देत असल्याची तक्रार जयपूरमधील एका रहिवासी असलेल्या व्यक्तीने केली होती. त्यानंतर जयपूरमधील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण केंद्राने शाहरूख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांच्यासह JB(जेबी) इंडस्ट्रीजचे अध्यक्ष यांना नोटीस बजावली आहे. पान मसाल्यात केशर असल्याचा दावा करणाऱ्या जाहिरातीबद्दल स्पष्टीकरण देण्यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण केंद्राने त्यांना १९ मार्च रोजी प्रत्यक्ष किंवा प्रतिनिधीमार्फत हजर राहण्याचे समन्स बजावले आहे.

# तब्बल 25 वर्षांपूर्वीचा हिशोब चुकता...!

## टीम इंडियाने कोरले चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळला गेला. हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवण्यात आला. संपूर्ण स्पर्धेत भारत अपराजित राहिला. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २५१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, भारताने ४९ षटकांत सहा गडी गमावून २५४ धावा करत लक्ष्य गाठले. रोहितने कर्णधारपदाची खेळी खेळली. रोहित शर्माने सर्वाधिक ७६ धावांची खेळी केली आणि संघाला संकटातून बाहेर काढले तर केएल राहुल ३४ धावांवर नाबाद राहिला.**

विजयासाठी २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या टीम इंडियाला रोहित शर्मा आणि शुभमन गिलने चांगली सुरुवात करून दिली. रोहित आणि गिलमध्ये १०५ धावांची शानदार भागीदारी झाली. गिलने ३१ धावा आणि रोहित शर्माने ७६ धावा केल्या. गिल आणि विराटच्या विकेट पडल्यानंतर टीम इंडियावर दबाव होता, अशा परिस्थितीत श्रेयस अय्यरने ४८ धावांची खेळी खेळून भारतीय संघावरील दबाव कमी केला. शेवटच्या षटकांमध्ये, हार्दिक पंड्याने १८ धावांची एक छोटी पण अतिशय महत्त्वाची खेळी खेळली. केएल राहुलनेही ३४ धावांचे योगदान दिले तर रवींद्र जडेजाने चौकाराच्या स्वरूपात विनिंग शॉट मारून भारताचा विजय निश्चित केला.हे भारताचे सलग दुसरे आयसीसी स्पर्धा विजेतेपद आहे. यापूर्वी २०२४ मध्ये टीम इंडियाने टी-२० विश्वचषक जिंकला होता. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ जिंकत भारतानं तब्बल २५ वर्षांपूर्वीचा हिशोब देखील चुकता केला आहे. दरम्यान, १५ ऑक्टोबर २००० या दिवशी म्हणजेच तब्बल २५ वर्षांपूर्वी भारत आणि न्यूझीलंड हे दोन देश आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यांत एकमेकांसमोर उभे ठाकले होते. नैरोबी या ठिकाणी हा सामना पार पडला होता. सौरभ गांगुली तेव्हा टीम इंडियाचा कर्णधार होता. त्या सामन्यात सौरभ गांगुलीच्या ११९ आणि सचिन तेंडुलकरच्या ६९ धावांच्या जोरावर भारताने न्यूझीलंडसमोर २६५ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. प्रत्युत्तरात न्यूझीलंडने १३२ धावांवर ५ विकेट गमावल्या. येथे ख्रिस हॅरिससह ख्रिस केर्न्सने डावाची सूत्रे हाती घेतली. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी १२२ धावांची भागीदारी केली आणि भारताच्या हातातोंडाशी आलेला विजेतेपदाचा घास हिरावला. केर्न्सने शतक झळकावले आणि २ चेंडू शिल्लक असताना आपल्या संघाच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. ११३ चेंडूंत २ षटकार आणि ८ चौकारांसह नाबाद १०२ धावा फटकावणारा अष्टपैलू केर्न्स हा अर्थातच न्यूझीलंडच्या विजेतेपदाचा शिल्पकार ठरला. ही भारताची सातवी आयसीसी ट्रॉफी आहे. यापूर्वी, संघाने १९८३ आणि २०११ चा एकदिवसीय विश्वचषक, २००७ आणि २०२४ चा टी-२० विश्वचषक आणि २००२, २०१३ आणि २०२५ चा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकला आहे. संपूर्ण स्पर्धेत भारत अपराजित राहिला.

### शेवटची 10 षटके ठरली महागडी

वरुण चक्रवर्तीने यंगला बाद करून किवींना पहिला धक्का दिला. यानंतर, कुलदीपची अद्भुत कामगिरी पाहायला मिळाली. त्याने रचिन रवींद्र आणि केन विल्यमसन यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. हे दोन्ही फलंदाज न्यूझीलंडसाठी आधारस्तंभ राहिले आहेत. या दोन विकेट पडताच किवीज संघ कमकुवत झाला.भारताकडून गोलंदाजीत कुलदीप यादव (१० षटकात ४० धावा) आणि वरुण चक्रवर्ती (१० षटकात ४५ धावा)यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. दरम्यान, जडेजाने एक (१० षटकात ३० धावा) तर शमीने (९.० षटकात ७ ४धावा) एक विकेट घेतली आणि एक खेळाडू धावबाद झाला. सामन्यात ४० षटकांच्या अखेरीस न्यूझीलंडने ५ गडी गमावून १७२ धावा केल्या होत्या. येथून, पुढील १० षटकांत, न्यूझीलंडने फक्त २ विकेट गमावल्या आणि एकूण ७९ धावा केल्या. विशेषतः मायकेल ब्रेसवेलची ५३ धावांची खेळी टीम इंडियासाठी अभ्यासक्रमाबाहेरची होती.

# रोहित शर्माबाबत निवृत्तीच्या अफवा!

## पुढे कोणत्याही अफवा पसरवल्या जाऊ नयेत: रोहित शर्मा



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला चार विकेट्सने पराभूत तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद पटकावले. न्यूझीलंडविरुद्ध भारताच्या विजयानंतर भारताचा कर्णधार रोहित शर्माने त्याच्या निवृत्तीच्या अफवांवर स्पष्ट उत्तर दिले आणि या अफवांवर पूर्णविराम लावला.**

या स्पर्धेच्या आधी अशी चर्चा होती की, भारतीय कर्णधार रोहित शर्मा स्पर्धा संपल्यानंतर एकदिवसीय क्रिकेटला निरोप देऊ शकतो. भारताच्या विजयानंतर, रोहितला सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत त्याच्या भविष्याबाबत विचारण्यात आले. सुरुवातीला या स्टार फलंदाजाने हसून प्रश्न सोडला आणि पुढे म्हणाला, “भविष्यात काही वेगळे प्लॅन नाहीत, जे जसं आहे तसंच सुरूच राहणार आहे. मी या फॉरमॅटमधून निवृत्त होत नाहीये. मी हे सांगतोय जेणेकरून पुढे कोणत्याही अफवा पसरवल्या जाऊ नयेत.”रोहितने अंतिम सामन्यात ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. त्याने दुसऱ्याच चेंडूवर काइल जेमिसनविरुद्ध त्याच्या ट्रेडमार्क पुल शॉट मारत एक मोठा षटकार खेचला. त्याने ४१ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले, जे आयसीसी स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील त्याचं पहिलंच अर्धशतक होतं. अंतिम सामन्यात कर्णधार रोहित शर्माने अनुभवी विराट कोहलीसह चौथे आयसीसी विजेतेपद जिंकत भारताचा सर्वात यशस्वी क्रिकेटपटू बनला आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या ३ आयसीसी स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. ३ स्पर्धेत फक्त एकदाच पराभवाला सामोरे जावे लागले. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात संघ उपविजेता ठरला. यानंतर टी-२० विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले. टी-२० विश्वचषक २०२४ फायनलमध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेवर विजय मिळवल्यानंतर रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यानंतर तो निवृत्ती जाहीर करेल.

### कोणत्याही अफवा पसरवल्या जाऊ नये

अशी चर्चा होती. पण रोहितच्या वक्तव्यानंतर सर्वच भारतीय चाहत्यांनी सुटकेचा निश्वास टाकला.या स्पर्धेच्या आधी अशी चर्चा होती की, भारतीय कर्णधार रोहित शर्मा स्पर्धा संपल्यानंतर एकदिवसीय क्रिकेटला निरोप देऊ शकतो. भारताच्या विजयानंतर, रोहितला सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत त्याच्या भविष्याबाबत विचारण्यात आले. सुरुवातीला या स्टार फलंदाजाने हसून प्रश्न सोडला आणि पुढे म्हणाला, “भविष्यात काही वेगळे प्लॅन नाहीत, जे जसं आहे तसंच सुरूच राहणार आहे. मी या फॉरमॅटमधून निवृत्त होत नाहीये. मी हे सांगतोय जेणेकरून पुढे कोणत्याही अफवा पसरवल्या जाऊ नयेत.”रोहितने अंतिम सामन्यात ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. त्याने दुसऱ्याच चेंडूवर काइल जेमिसनविरुद्ध त्याच्या ट्रेडमार्क पुल शॉट मारत एक मोठा षटकार खेचला. त्याने ४१ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले, जे आयसीसी स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील त्याचं पहिलंच अर्धशतक होतं.अंतिम सामन्यात कर्णधार रोहित शर्माने अनुभवी विराट कोहलीसह चौथे आयसीसी विजेतेपद जिंकत भारताचा सर्वात यशस्वी क्रिकेटपटू बनला आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या ३ आयसीसी स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
। दि. 10 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# कायद्याची माहिती झाल्यास स्त्री अधिक सक्षम : न्यायदंडाधिकारी बिराजदार

## शिक्षण विश्व: पीसीयूस्कूल ऑफ लॉ मध्ये महिला सक्षमीकरणावर परिषद संपन्न

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आजची स्त्री ही आधुनिक विचारांची आहे. तिच्या सक्षमीकरणासाठी तिचा स्वतःवर विश्वास हवा. नवीन कायद्याची माहिती झाल्यास आजची आधुनिक स्त्री अधिक सक्षम होईल असे मत पुणे, शिवाजीनगर न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी) अमृत बिराजदार यांनी व्यक्त केले**



पीसीइटी एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पीसीयू मधील स्कूल ऑफ लॉ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त "लिंग आधारित हिंसाचाराचा सामना करण्यासाठी नवीन गुन्हेगारी कायद्याद्वारे महिला सक्षमीकरण" या विषयावर आयोजित केलेल्या "पीसीयू लेक्स इम्पेरियम २०२५" या परिषदेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी परिषदेस कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपाडे, अॅड. दुर्गा दत्त, ललित कुमार झुंझुनवाला, विभागप्रमुख प्रियांक राणा, सहा. प्रा. प्रदीप यादव, पुलकित अग्रवाल, अदिती चौबे, स्कूल ऑफ लॉ चे प्राध्यापक आणि बीए. एलएलबी आणि एलएलबी चे विद्यार्थी उपस्थित होते.

### महिला दिनानिमित्त शुभेच्छा

या परिषदेत पीसीयूच्या स्कूल ऑफ लॉची महत्त्वाच्या सामाजिक समस्यांवर जागरुकता आणि शिक्षणाला चालना देण्यासाठीची वचनबद्धता असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपाडे यांनी सांगितले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थितांना महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.




EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally